देशोन्नती ०६/०१/२०२५

# आरोपींकडून चोरीच्या चार मोटारसायकली जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत चोरीस गेलेल्या चार मोटारसायकली जप्त केल्या असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरु केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथक ५ जानेवारी रोजी पेट्रोलिंग करत असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरून गौस नासेर खान, मिनाजखाँ आलमखाँ पठाण व एक विधिसंघर्ष बालकास ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या दोन मोटासायकली व मोटासायकलीचे पार्ट असा एकूण ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. केलेल्या तपासावरून त्यांचा एक साथीदार अमेर याच्यासोबत मिळून गुन्हे केल्याचे उघड झाले. यातील विधिसंघर्ष बालकास त्याच्या नातेवाईकाच्या ताब्यात दिले असून दोन्ही आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.



या कारवाई पथकात अंमलदार गंगाधर कदम, विलास कदम, बालाजी कदम, संतोष बेलुरोड व इत कर्मचाऱ्यांचा समावेश होता.